## ठाणे महानगरपालिका,ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय.
दिनांक ०३/१२/२००९

## ठाणे महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त
## सभा सूचना क्रमांक ७ दिनांक २६/११/२००९

ठाणे महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक ०३/१२/२००९ रोजी सभा सूचना क्रमांक ७ दिनांक २६/११/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करण्याकरिता ठाणे महानगरपालिकेच्या " भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात " सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी पिठासिन अधिकारी म्हणून मा.जिल्हाधिकारी, ठाणे हे . उपस्थित होते.

### सदर सभेस उपस्थित सदस्य खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| १. श्री.पाटील बाळकृष्ण पुंडलिक | २. श्री.सारंग राजेश नामदेव |
| ३. श्रीमती पाटील कविता सुरेश | ४. श्री मधुकर रामचंद्र पावशे |
| ५. श्री.आनंदा तुकाराम केसरे | ६. श्री.जयनाथ यशवंत पुर्णेकर |
| ७. .सौ.शिंदे मिनाक्षी राजेंद्र | ८. श्री.रामचंद्र लू फडतरे |
| ९. श्री.दिनेश मनोर पाथरे | १०. सौ.ताई मारुती भोंडवे |
| ११. श्री. राजेश रामचंद्र ठाकूर | १२. श्री.जगदाळे णमंत ज्ञानू |
| १३. श्रीमती इंदिसे द्रौपदाबाई जगदीश | १४. श्रीमती अनिता अशोक सावंत |
| १५. श्री.नागसेन (भैय्यासाहेब)गंगाराम इंदिसे | १६. श्री.सुधाकर वामन चवण |
| १७. सौ.वनिता गंगाराम इंदिसे | १८. सौ.कल्पना रिश्चंद्र पाटील |
| १९. श्री.रिश्चंद्र श्रीपत पाटील | २०. श्री.भोईर संजय देवराम |
| २१ श्री.भोईर देवराम लक्ष्मण | २२. श्री.रविंद्र माणिक पाटील |
| २३. श्रीमती शारदा दादू पाटील | २४. श्रीमती तरे मेश्वरी संजय |
| २५. श्री.एगडे राम री | २६. श्रीमती छाया मनोर राव |
| २७. सौ. परिषा प्रताप सरनाईक | २८. श्री.सुधीर प्रलद बर्गे |
| २९. श्री.बारटक्के दिलीप चंद्रकांत | ३०. श्रीमती यादव केवळादेवी रामनयन |
| ३१. श्रीमती राधा फत्तेबादूर सिं | ३२. श्री.कांबळे सुरेश चंदू |
| ३३. सौ.एकता एकनाथ भोईर | ३४. श्री.कांबळे पद्माकर संभाजी |
| ३५. श्रीमती अपर्णा नंदकुमार यादव | ३६. श्री.दशरथ बाबुराव पालांडे |
| ३७.श्री. संतोष वसंत वडवले | ३८. कु.योगिता रमेश वैती |
| ३९. श्री.विचारे राजन बाबूराव | ४०. श्री.सोनार संजय प्रभाकर |
| ४१. श्री.राऊळ अशोक राजाराम | ४२. श्री.कोकाटे सुधीर विष्णू |
| ४३. श्री.साळवी संतोष गजानन | ४४. श्री.मुल्ला नजीब सुलेमान |
| ४५. श्रीमती मुल्ला फातिमा अंजूम मुम्मद असिफ | ४६. श्रीमती कदम रुपाली रमेश |
| ४७. श्री.पाटणकर मिलिंद माधव | ४८. श्री.लासे मनोज विठ्ठल |
| ४९. श्री.पाटील उमेश काशिनाथ | ५०. सौ.गौरी अनिता सुनिल |
| ५१. श्री.कांबळे दिनेश दाजी | ५२.सौ.साळवी अपर्णा मिलींद |

2..

५३. श्रीमती खातू सुरेखा सुरेश
५४.श्री. अशोक नारायण भोईर
५५.श्री.मिलिंद भारत पाटील
५६.सौ.प्रमिला मुकुंद केणी
५७.श्रीमती शांता शामजी सोलंकी
५८.श्री.बिष्ट मदिप उर्फ मुन्ना
५९.सौ.स्मिता सुभाष इंदुलकर
श्रीमती सुासिनी (प्रतिभा) सुनिल लोखंडे
६०.श्री.नारायण शंकर पवार
६१.श्री.सामंत विलास शिवराम
६२.श्री.वाघुले संजय संतू
६३.श्रीमती पाटील सुजाता भास्कर
६४.श्रीमती अनिता रिाकांत फर्डे
६५.श्रीमती देशमुख स्मिता मधुकर
६६.श्री श्री.अशोक बारकू वैती
६७.श्री.जनार्दन कृष्णा खेतले
६८.श्री.वैती रीश काशिनाथ
६९.श्री.ोडावडेकर मधुकर विठठल
७०.श्री.राम पांडुरंग रेपाळे
७१.श्रीमती सुनिता (ताई) सुरेश सावंत
७२.श्री.शैलेश तुकाराम शिंदे
७३.सौ.पाटील प्रभावती माणिक
७४.डॉ.जितेंद्र प्रभाकर वाघ
७५.श्रीमती कदम निता मदन
७६.श्री.मनोज तुकाराम शिंदे
७७.सौ.घाग संगीता चंद्रगुप्त
७८.श्री.घाग चंद्रगुप्त सिताराम
७९.श्री.कणसे घनश्याम शिवाजी
८०.श्री.मोरे संजय भाऊराव
८१.श्री.फाटक रविंद्र सदानंद
८२.श्री.सावंत शैलेश तुकाराम
८३.सौ.संगिता मिलिंद बनकर
८४.श्री.पांडुरंग गोविंद पाटील
८६ श्री.भरत अभिमन्यु चवण
८७. श्री.लक्ष्मण (लच्छू)चंदुमल टिकमाणी
८८.श्री.राऊत प्रकाश रिश्चंद्र
८९. श्री.खारकर राजेश आत्माराम
९०.श्री.खारकर सुभाष आत्माराम
९१. श्री.सचिन जयराज मत्रे
९२. सौ.मनिषा मेश साळवी
९३ श्री. गणेश यशवंत साळवी
९४. श्री.साप्ते राजेंद्र रमेश
९५ .श्रीमती काकडे अनिता बालाजी
९६. श्री.कुरेशी यासीन अय्युब
९७. श्री.सैय्यद अली अशरफ उर्फ भाईसोब
९८. श्री.शिवदास नाना भगत
९९ श्री.मढवी रमाकांत दशरथ
१००.श्री.राजन नारायण किणे.
१०१.सौ. अनिता राजन किणे
१०२.श्री.भगत सुधिर रामचंद्र
१०३.सौ.कोमुर्लेकर स्वाती मेंद्र
१०४.श्री.मेंद्र वसंतराव कोमुर्लेकर
१०५. श्रीमती नाईक फीजा नसरुददीन
१०६.श्री.अन्सारी असलम सलीम
१०७. श्रीमती खान शगुफता नसीर
१०८. सौ.राऊत आशरीन ईब्रामि
१०९. श्रीमती शेख रजिया इकबाल
११०. श्री.डांगरे सिराज अमंद अली
१११. श्रीमती अन्सारी इमतियाजबानू उर्फ (बेबी आपा)
११२. श्री.सुभाष गणू भोईर
११३. श्री.मत्रे दिलीप रतन
.

**स्विकृत सदस्य**

१. श्री.नरेश गणपत म्हस्के
२. श्री. अनिल गजाानन सावे
३..श्री. पवन काशिनाथ कदम
४..श्री. सन्नी वर्गीस थॉमस
५ श्री. मिलींद मनाहेर साळवी

**गैरहजर सदस्य :-**

१) श्री. संजय रामचंद्र तांडेल
२) श्री. बळीराम वासुदेव नईबागकर ( पदरिक्त)
३) श्री. हरेश्वर तांडेल ( पदरिक्त)

मा.महापालिका सचिव :-

मा.पिठासीन अधिकारी-मा.जिल्हाधिकारी सो., यांना मी विनंती करते की त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळयास पुष्पहार अर्पण करावा.

( मा.पिठासिन अधिकारी छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळयास पुष्पहार अर्पण करतात.)

तद्नंतर वंदेमातरम् होऊन सभेस सुरुवात होते.

मा.पिठासीन अधिकारी :-

सर्व वृत्तवाहिनींच्या प्रतिनिधींना मी विनंती करतो की, मला निवडणूक प्रक्रिया सुरु करावयाची आहे. आपण शेवटी परत येऊ शकता. आपण बाहेरुन देखिल रेकॉर्डिंग करु शकता. इथे मला निवडणूक प्रक्रिया सुरु करावयाची आहे. आपण जरा लवकर बाजूला झालात तर बरे होईल.

मा.महापालिका सचिव सभेचा अजेंडा वाचून दाखवितात.

प्रकरण क्रमांक १४९ : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१)(५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे पालिका सदस्यांपैकी एका सदस्याची (सुधारणा नियम २००६ नुसार ) ठाणे महानगरपालिकेच्या ' महापौर ' पदासाठी अडीच वर्षासाठी निवड करणे.

मा.महापालिका सचिव :

सदर प्रकरणी आपल्याकडे मा.महापौर पदासाठी दोन नामनिर्देशनपत्र दाखल झालेली आहेत. महापौर पदासाठी निवडणूक कार्यक्रमानुसार २९ नोव्हेंबर २००९ रोजी दोन नामनिर्देशनपत्र दाखल झालेली असून ती खालील प्रमाणे ..

१ ) श्री.नजीब सुलेमान मुल्ला २ ) श्री.अशोक बारकू वैती

सदरील नामनिर्देशन पत्र आज दिनांक ३.१२.२००९ रोजी मी महापालिका सचिव मा.पिठासीन अधिकारी/जिल्हाधिकारी सो., यांचेकडे सुपूर्द करीत आहे.

मा.विरोधी पक्ष नेता :

मा.पिठासीन अधिकारी सो., या मध्ये प्रकरण क्रमांक १४९ मध्ये आपण म्हटलेले आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१)(५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे पालिका सदस्यांपैकी एका सदस्याची (सुधारणा नियम २००६ नुसार ) ठाणे महानगरपालिकेच्या ' महापौर ' पदासाठी अडीच वर्षासाठी निवड करणे.

महापालिकेचा कालावधी वाढलेला आहे का ?

मा.महापालिका सचिव :

उर्वरित कालावधीसाठी .

मा.विरोधी पक्ष नेते :

महापालिकेचे महापौर अडीच वर्षासाठी बसणार म्हणजे महानगरपालिकेचा कार्यकाल वाढलेला आहे का सहा महिन्यांनी?

मा.महापालिका सचिव :

नाही , उर्वरित कालावधीसाठी .

मा.विरोधी पक्ष नेते :

विषयपत्रिकेमध्ये आपण अडीच वर्षांसाठी असे म्हटलेले आहे. म्हणजे आताचे जे महापौर असतील ते अडीच वर्षांसाठी असतील का ? असतील तर आमच्या शुभेच्छा आहेत.

श्री.मिलिंद पाटणकर :

तुमच्या सदिच्छा असतील तर त्यांचा कार्यकाल आपण सहा महिन्यांनी वाढवू.

मा.विरोधी पक्ष नेते :

याच्यामध्ये निश्चित काय आहे ?

मा.महापालिका सचिव :

उर्वरित कालावधीसाठी मा.महापौर पदाची निवड करावयाची आहे असे मी डिक्लेअर करते.

मा.विरोधी पक्ष नेते :

पिठासीन अधिकारी यांनी उत्तर दयावे. परिपत्रक जर चुकीचे असेल तर ते आपल्याला मागे घ्यावे लागेल. निवडणूक रद्द करावी लागेल. कारण आपण जे प्रकरण आणले आहे ते प्रकरणच जर बेकायदेशीर असेल तर निश्चित आपल्याला ते प्रकरण मागे घ्यावे लागेल.

मा.महापालिका सचिव :

मी आपल्याला खुलासा करु इच्छिते मा.पिठासीन अधिकारी आपली जी विषयपत्रिका काढली गेली आहे त्यामध्ये नजरचुकीने ' उर्वरीत कालावधी ' च्या ऐवजी ' अडीच वर्षांचे कालावधी करिता ' असा उल्लेख केला गेला आहे त्याबाबत मी दिलगीरी व्यक्त करते आहे.

श्री.सुभाष भोईर :

ही गोष्ट आतापर्यंत आपल्या लक्षात आली नाही का ? २६.११.०९ आणि आजची तारिख ३ आहे. २६.११.२००९ रोजी विषयपत्रिका काढल्यानंतर नजरचुकीने हे झाल्याचे आपल्या लक्षात का आले नाही ?

मा.पिठासीन अधिकारी :-

महापालिका सचिवांनी दिलगीरी व्यक्त केलेली आहे. आणि 'उर्वरित कालावधीसाठी' हा शब्द त्यांनी सांगितलेला आहे आपल्याला. मी आता आपल्याकडे जे नामनिर्देशनपत्र आलेले आहे त्याची वैधता तपासणी करुन.. .. ..

मा.विरोधी पक्ष नेता :

प्रकरणाचा जो विषय आहे तो जर चुकीचा असेल तर निश्चितपणे याच्याकरिता कायदेशीर तरतूद....

श्री.शैलेश शिंदे :

सदरचे प्रकरण चुकीचे असल्यामुळे मागे घेण्यांत यावे.

श्री.सुभाष भोईर :

सदरची निवडणूक ही बेकायदेशीर असल्यामुळे रद्द करण्यांत यावी, पुन्हा परिपत्रक काढावे. कारण कोणत्याही निवडणूकीत अशा चुका चालत नाही.

मा.पिठासीन अधिकारी :-

विधानसभा व राज्यसभेच्या निवडणूक आचारसंहितेच्या कारणास्तव विद्यमान मा.महापौर/मा.उपमहापौर पदाचा कार्यकाल वाढला होता. आता विद्यमान महापौरांचा कालावधी संपलेला आहे, आणि मला आता निवडणूक प्रक्रिया घेणे हे कायदेशीर प्रक्रियेमध्ये बसते आहे. माझ्याकडे दोन अर्ज आलेले आहेत त्यांची नांवे मी जाहिर करतो. श्री.नजीब सुलेमान मुल्ला यांचा अर्ज मी वैध ठरवित आहे.

मा.विरोधी पक्ष नेते :

मा.पिठासिन अधिकारी महोदय, माझ्या प्रश्नावर आपण रुलींग दयावे.

मा.पिठासीन अधिकारी :-

दुसरा अर्ज श्री.अशोक बारकू वैती यांचा आहे सदरचे नामनिर्देशनपत्र देखिल मी वैध ठरवित आहे.

मा.पिठासीन अधिकारी :

आपले शासन नोटीफिकेशन जे आहे ११ फेब्रूवारी २००५ -महापौर/उपमहापौर यांचे निवडणूकीसाठी बोलाविण्यांत आलेली विशेष बैठक यामध्ये तिसरा जो मुद्दा आहे ' अशी बोलाविलेली बैठक तहकूब वा रद्द करता येणार नाही '.

मा.विरोधी पक्ष नेता :

आम्ही तहकूबी मांडत नाही. या ठिकाणी आपण दिशाभूल करता आहात,आम्ही तहकूबी मांडत नाही.

श्री.नरेश म्हस्के :

पिठासीन अधिकारी हे ठाणे जिल्हयाचे जिल्हाधिकारी आहेत, त्यांचा तुम्ही मान राखायला हवा.

श्री.संजय मोरे :

शासनाच्या निर्णयाप्रमाणे विषयपत्रिका आलेली आहे.

मा.पिठासीन अधिकारी :-

आजची बैठक मला तहकूब करता येणार नाही, रद्द करता येणार नाही. आणि ही जी चूक झालेली आहे, त्याबाबत महापालिका सचिवांनी दिलगीरी व्यक्त केलेली आहे आणि ' अडीच वर्षांचे कालावधी ' ऐवजी ' उर्वरीत कालावधी ' अशी त्यांनी या ठिकाणी दुरुस्ती सांगितलेली आहे. त्यामुळे आपली हरकत ओव्हररुल्ड करण्यांत येत आहे. (फेटाळण्यांत येत आहे).

मा.सुभाष भोईर :

मा.पिठासीन अधिकारी मी आपल्याला विनंती करतो की या ठिकाणी ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून चुका झालेल्या आहेत शासनाचे जरी परिपत्रक असले तरी देखिल चुका झालेल्या असतांना परिपत्रकाच्या माध्यमातून निवडणूका घेणे योग्य नाही.

मा.पिठासीन अधिकारी :

मा.नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना दिनांक ११.२.२००५ नियम ६(३) नुसार नामनिर्देशन मागे घेण्याकरिता मी १५ मिनिटांचा कालावधी जाहिर करित आहे.

मा.विरोधी पक्ष नेते :

मा.पिठासीन अधिकारी, आम्ही मांडलेल्या मुद्दयाला प्रथम आपण रुलींग दया.

मा.पिठासीन अधिकारी :

मी आधीच सांगितले होते की, मला ही सभा रद्द किंवा तहकूब करता येणार नाही. आणि ही टंकलेखनामधील चूक आहे. आणि त्याबाबत महापालिका सचिवांनी दिलगीरी व्यक्त केलेली आहे. त्यामुळे ही प्रक्रिया थांबविता येणार नाही.

श्री.नजीब मुल्ला :

अडीच वर्षांचा जो कालावधी म्हटला आहे त्याबाबत खुलासा करण्यांत यावा.

मा.विरोधी पक्ष नेता :

मा.पिठासीन अधिकारी सो., .. ..

मा.पिठासिन अधिकारी :

मी तुम्हाला ऑलरेडी रुलींग दिलेले आहे आणि प्रत्येक प्रश्नाचे तुम्ही तुमच्या पध्दतीने मला उत्तर मागू शकत नाही.

मा.विरोधी पक्ष नेता :

मा.पिठासीन अधिकारी, आमचा मुद्दा अतिशय स्वच्छ आहे की जे आहे ते प्रकरणच जर चुकीचे असेल तर ते प्रकरण आपण आता विचारात घेणे योग्य आहे की नाही ?

मा.पिठासिन अधिकारी :

मी ऑलरेडी खुलासा केलेला आहे. ही चूक जी आहे ती टंकलेखनातील चूक आहे त्याबाबत महापालिका सचिवांनी दिलगीरी व्यक्त केलेली आहे, आणि मी कोणत्याही परिस्थितीत ही निवडणूक प्रक्रिया/सभा थांबवू शकत नाही. माझा निर्णय मी आपल्याला दिलेला आहे.

मा.पिठासीन अधिकारी :

तुम्ही सर्व सदस्य जर एकत्र बोलायला लागलात तर मला काहीच ऐकायला येत नाही.

मा.विरोधी पक्ष नेता :

हे कायदेशीर योग्य आहे का हे आम्हाला सांगा.

मा.पिठासीन अधिकारी :

मी ऑलरेडी रुलींग दिलेले आहे. तुमच्या पध्दतीने उत्तर देण्याबाबत तुम्ही मला बंधन कसे काय घालू शकता ?

मा.विरोधी पक्ष नेता :

मा.पिठासीन अधिकारी सो., आमचा एवढाच मुद्दा आहे की जे प्रकरण या ठिकाणी आणलेले आहे त्या प्रकरणात जो उल्लेख केलेला आहे, महापौर पदाची अडीच वर्षासाठी निवड करणे हे प्रकरण योग्य आहे का हे तुम्हीच सांगा.

मा.पिठासीन अधिकारी :

मी वारंवार आपल्याला सांगितले आहे.

श्री.सुभाष भोईर :

मा.पिठासीन अधिकारी यांना मी विनंती करतो की,एखादया उमेदवाराने चुकीचा फॉर्म भरला तर तो डिस्कॉलिफाय होतो. मग या ठिकाणी विषयपत्रिका चुकीची काढलेली आहे. विषयपत्रिकाच जर चुकीची असेल तर निवडणूक होऊ शकते का ? थोडी चूक असेल तर आमचा अर्ज रद्द केला जातो.

मा.पिठासीन अधिकारी :

मायनर चूक ओव्हररुल्ड करता येते. विधानमंडळाचे सन्मा.सदस्य या ठिकाणी आहेत त्यांना माहिती आहे.

श्री.सुभाष भोईर :

या सभागृहात २५ वर्षे मी काम करतो आहे आणि अशी चूक याा सभागृहात पहिल्यांदाच दिसते आहे. म्हणून ही निवडणूक अयोग्य होणार आहे तरी यासंबंधीचा निर्णय आम्हाला पाहिजे आहे.

श्री.मिलिंद पाटणकर :

पिठासीन अधिकारी यांनी निर्णय दिलेला आहे तो न मानणे म्हणजे निवडणूक प्रक्रियेमध्ये अडथळा आणणे असा अर्थ होऊ शकतो आणि या सदस्यांवर कारवाई होऊ शकते.

श्री.संजय मोरे :

कामकाजात अडथळा आणणे हे बेकायदेशीर होऊ शकते.

(मा.पिठासीन अधिकारी सर्व सदस्यांना बसण्याविषयी सूचना देतात)

मा.पिठासीन अधिकारी :

या ठिकाणी विधानमंडळातील सदस्य आहेत आणि त्यांना माहिती आहे की मायनर चुका हया ओव्हररुल्ड करता येतात.

श्री.सुभाष भोईर :

मा.पिठासीन अधिकारी सो., निवडणूकीमध्ये मायनर चुका देखिल चालत नाहीत. नामनिर्देशनात झालेल्या चुका अधिकारी मान्य करीत नाहीत.

मा.पिठासीन अधिकारी :

महापालिका सचिवांनी ही टंकलेखनातील चूक असल्याबाबत सांगितले आहे. प्रकरण चुकीचे नाही हे मी अगोदरच सांगितले आहे.

मा.विरोधी पक्ष नेता :

हा विषय जो मांडला आहे तोच चुकीचा आहे.

मा.पिठासीन अधिकारी :

प्रकरण बरोबर आहे असेच मी म्हटले आहे. निवडणूकीची प्रक्रिया बरोबर आहे.

श्री.मनोज शिंदे :

एखादया महापौरांना सहा महिन्यांचा कालावधी वाढवून देण्याचा आपला अधिकार आहे का ?

मा.पिठासीन अधिकारी :

कालावधी सांगितला आहे, दुरुस्ती केली आहे.

श्री.अशोक राऊळ :

दुरुस्तीप्रमाणे नविन विषयपत्रिका सात दिवसांची मुदत देऊन काढा. आणि नविन सभा घ्या.

श्री.सुभाष भोईर :

मा.पिठासीन अधिकारी यांना पुन्हा एकदा विनंती करतो आहे की, सदरची निवडणूक ही बेकायदेशीर ठरणार आहे त्यामुळे पुन्हा नोटीफिकेशन काढून सात दिवसांची मुदत दयावी आणि पुन्हा महापौर पदाची निवडणूक घ्यावी. नामनिर्देशनपत्र पुन्हा घ्यावीत आणि उमेदवारांनी नविन फॉर्म भरावेत अशी आमची मागणी आहे.

मा.पिठासीन अधिकारी :

या ठिकाणी वेळ संपलेली आहे. आणि महापौर पदाकरिता वैध असलेल्या उमेदवारांची वर्णानुक्रमानुसार मी नांवे वाचून दाखवित आहे ती पुढील प्रमाणे..

१ ) श्री.अशोक बारकू वैती
२ ) श्री.नजीब सुलेमान मुल्ला

( विहीत मुदतीत उमेदवारांनी अर्ज मागे न घेतल्याने प्रत्यक्ष मतदानास सुरुवात होते. )

श्री.सुभाष भोईर :

मा.पिठासीन अधिकारी यांना पुन्हा एकदा विनंती करतो आहे की, सदरची निवडणूक ही बेकायदेशीर ठरणार आहे त्यामुळे पुन्हा नोटीफिकेशन काढून सात दिवसांची मुदत दयावी आणि पुन्हा महापौर पदाची निवडणूक घ्यावी. नामनिर्देशनपत्र पुन्हा घ्यावीत आणि उमेदवारांनी नविन फॉर्म भरावेत अशी आमची मागणी आहे.

मा.पिठासीन अधिकारी :

मी आता जाहिर करु इच्छितो की महापौर पदाचे उमेदवार श्री.अशोक बारकू वैती यांच्या बाजूने ज्या सदस्यांना मतदान करावयाचे आहे त्यांनी हात वर करावेत.

मा.महापालिका सचिव :

सन्मा.सदस्यांना सूचना करण्यांत येत आहे की, या ठिकाणी आपण जे मतदान करणार आहात त्याबाबत मतदान केल्यानंतर आपले नावासमोर वॉर्ड क्रमांक समोर आपण स्वाक्षरी करावयाची आहे. आणि त्याचा पेपर सचिव विभागातील कर्मचारी आपल्या आसनाकडे घेऊन येतील त्यावर आपण मतदानानंतर स्वाक्षरी आपल्या नांवासमोर करावयाची आहे.

श्री.सुभाष भोईर :

मा.पिठासीन अधिकारी ही निवडणूक बेकायदेशीर आहे आणि आम्ही याचा निषेध करतो आहोत.

मा.पिठासीन अधिकारी :

सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करण्यांत येत आहे की त्यांनी आसनस्थ व्हावे.

श्री.मनोज शिंदे :

पिठासीन अधिकारी महोदय, या ठिकाणी मतदान प्रक्रियेला आपण सुरुवात केलेली आहे.. ..

श्री.पांडूरंग पाटील :

मा.पिठासीन अधिकारी महोदय, मतदान प्रक्रियेला सुरुवात झालेली आहे. वारंवार अडथळे आणणे योग्य आहे का ?

श्री. मनोज शिंदे :

पिठासीन अधिकारी महोदय, मला बोलू दया, या ठिकाणी मतदान प्रक्रियेला सुरुवात झालेली आहे. मतदानाकरिता जी पध्दत वापरली आहे, त्या पध्दतीने मतदान हात वरती करुन आणि आवाजी मतदानाने झाले पाहिजे. मुंबई महानगरपालिकेचे मतदान आपण दूरदर्शनवर पाहिले असेल प्रत्येक प्रभागाचा नगरसेवक हा उभा राहून मी अमुकअमुक व्यक्तीला मतदान करतो असे मतदान त्यांनी केलेल आहे. या ठिकाणी मी शंका व्यक्त करतो की ज्या मतदारांनी मतदान केले आहे ते कोणाला केले आहे ते आम्हाला सांगा.

मा.पिठासीन अधिकारी :

आता महापौर पदाचे दुसरे उमेदवार श्री.नजीब सुलेमान मुल्ला यांना ज्या मतदारांना मतदान करावयाचे असेल त्यांनी हात वर करावेत.

श्री.नजीब मुल्ला :

माझी पिठासीन अधिकारी यांना महापौर पदाचा उमेदवार म्हणून विनंती आहे की, .. ..

मा.पिठासीन अधिकारी :

मी निवडणूक प्रक्रिया जाहिर केलेली आहे, ज्या सदस्यांना मतदान करावयाचे आहे त्यांनी हात उंचावून मतदान करावे.

श्री.नजीब मुल्ला :

मा.पिठासीन अधिकारी महोदय, एक उमेदवार म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की हे प्रकरण आहे ते चुकीचे आणल्यामुळे ते आम्हाला नामंजूर आहे ते रद्द व्हावे म्हणून आम्ही निवडणूकीवर बहिष्कार टाकतो आहोत.

( विरोधी पक्ष सदस्य प्रत्यक्ष मतदानावर बहिष्कार टाकल्याचे जाहिर करतात मात्र त्यांनी सभागृह सोडले नाही).

श्री.मनोज शिंदे :

मा.पिठासीन अधिकारी, पालिका सदस्यांपैकी एका सदस्याची (सुधारणा नियम २००६ नुसार ) ठाणे महानगरपालिकेच्या ‘ महापौर ’ पदासाठी अडीच वर्षासाठी निवड करणे बाबतचा विषय या ठिकाणी आलेला आहे. सदरचे प्रकरण क्रमांक १४९ हे चुकीचे असून ते नियमबाहय आहे. त्यामुळे सदरचे प्रकरण या ठिकाणी आम्ही . .. ..

मा.पिठासीन अधिकारी :

मी ऑलरेडी मतदान प्रक्रिया सुरु केलेली आहे. सूचना केली आहे की जर श्री.नजीब सुलेमान मुल्ला यांना कोणी मतदान करु इच्छित असेल तर त्यांनी हात उंचावून मतदान करावे.

(सन्मा.सदस्य श्री.सुधीर बर्गे हात उंचावून मतदान करतात).

(युतीचे सदस्य सभागृहात शिवसेना - भाजप युतीच्या विजयाच्या घोषणा देण्यास सुरुवात करतात.)

श्री.अशोक राऊळ :

मा.पिठासीन अधिकारी महोदय, या ठिकाणी ज्या पध्दतीने मतदान प्रक्रिया आपण चालू केली, विषयपत्रिका चुकीची काढली त्या चुकीच्या विषयपत्रिकेवरील आपण जे मतदान घेत आहात, विषयपत्रिका रद्द करुन नविन विषयपत्रिका काढल्याशिवाय अशा प्रकारे चुकीच्या विषयपत्रिकेवर मतदान घेणे हे नियमाला व कायदयाला धरुन होणार नाही. आणि या ठिकाणी आपण मा.पिठासीन अधिकारी महोदय जी निवडणूक प्रक्रिया चालू आहे त्याला आमचा विरोध आहे आणि म्हणून आम्ही आजच्या या निवडणूक प्रक्रियेवर बहिष्कार टाकतो आहोत याची आपण दखल घ्यावी नोंद घ्यावी. जी मतदान प्रक्रिया हाताळली ती प्रक्रिया बेकायदेशीर असल्यामुळे आम्ही बहिष्कार घालतो आहोत व हा बहिष्काराचा निर्णय या लोकशाही आघाडीशी संबंधित असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस , समाजवादी आणि सपा ( शब्द स्पष्ट नाहीत ) या सर्व पक्षांना लागू आहे आणि या व्हीपच्या विरोधात जर कोणी मतदान केले असेल तर त्याबाबतीत त्यांचेवर कायदेशीर कारवाई निश्चितपणे केली जाईल याची आपण नोंद घ्यावी. बहिष्काराचा निर्णय हा आघाडीच्या सर्व सदस्यांना लागू आहे.

मा.पिठासीन अधिकारी :-

सर्व सन्मा.सदस्य, मुंबई प्रांतिक महानगरपालिका महापौर/उपमहापौर निवडणूक अधिनियम ११.२.२००५ च्या अधिसूचनेद्वारे नियम ७(७) अन्वये महापौर पदासाठी निवडणूक लढविणा-या प्रत्येक उमेदवारास मिळालेल्या मतांची संख्या मी खालीलप्रमाणे घोषित करीत आहे.

| | |
|---|---|
| श्री.अशोक बारकू वैती | ६३ मते |
| श्री.नजीब सुलेमान मुल्ला | १ मत |
| तटस्थ | ४८ मते |

महाराष्ट्र शासन राजपत्र दि.११.२.२००५ मधील नियम ७(३) अन्वये उमेदवारांच्या बाजूने मतदान केलेल्या सदस्यांची नांवे खालीलप्रमाणे.

श्री.अशोक बारकू वैती यांच्या बाजूने मतदान केलेल्या सदस्यांची नांवे खालीलप्रमाणे...

| अ.क्र. | सदस्यांचे नांव |
|---|---|
| १ | श्री.पाटील बाळकृष्ण पुंडलिक |
| २ | श्री.सारंग राजेश नामदेव |
| ३ | श्रीमती पाटील कविता सुरेश |
| ४ | श्री.मधुकर रामचंद्र पावशे |
| ५ | श्री.आनंदा तुकाराम केसरे |
| ६ | सौ.शिंदे मिनाक्षी राजेंद्र |
| ७ | श्री.रामचंद्र लहू फडतरे |
| ८ | श्री.दिनेश मनोहर पाथरे |
| ९ | सौ.ताई मारुती भोंडवे |
| १० | श्रीमती इंदिसे द्रौपदाबाई जगदिश |
| ११ | श्रीमती अनिता अशोक सावंत |
| १२ | श्री.नागसेन गंगाराम इंदिसे |
| १३ | श्री.सुधाकर वामन चव्हाण |
| १४ | सौ.वनिता गंगाराम इंदिसे |
| १५ | श्रीमती तरे महेश्वरी संजय |
| १६ | श्रीमती शारदा दादू पाटील |
| १७ | श्री.एगडे राम हरी |
| १८ | श्रीमती छाया मनोहर राव |
| १९ | सौ.परिषा प्रताप सरनाईक |
| २० | श्री.बारटक्के दिलीप चंद्रकांत |
| २१ | श्रीमती राधा फत्तेबहादूर सिंग |
| २२ | सौ.एकता एकनाथ भोईर |

| | |
|---|---|
| २३ | श्री.कांबळे पद्माकर संभाजी |
| २४ | श्रीमती अपर्णा नंदकुमार यादव |
| २५ | श्री.दशरथ बाबूराव पालांडे |
| २६ | श्री.संतोष वसंत वडवले |
| २७ | कु.योगिता रमेश वैती |
| २८ | श्री.विचारे राजन बाबूराव |
| २९ | श्री.सोनार संजय प्रभाकर |
| ३० | श्री.कोकाटे सुधीर विष्णू |
| ३१ | श्रीमती कदम रुपाली रमेश |
| ३२ | श्री.पाटणकर मिलिंद माधव |
| ३३ | श्री.लासे मनोज विठ्ठल |
| ३४ | सौ.गौरी अनिता सुनिल |
| ३५ | श्रीमती खातू सुरेखा सुरेश |
| ३६ | श्री.भोईर अशोक नारायण |
| ३७ | श्रीमती शांता शामजी सोलंकी |
| ३८ | श्रीमती इंदुलकर स्मिता सुभाष |
| ३९ | श्रीमती सुहासिनी (प्रतिभा) सुनिल लोखंडे |
| ४० | श्री.सामंत विलास शिवराम |
| ४१ | श्री.वाघुले संजय संतू |
| ४२ | श्रीमती पाटील सुजाता भास्कर |
| ४३ | श्रीमती अनिता हिराकांत फर्डे |
| ४४ | श्रीमती देशमुख स्मिता मधुकर |
| ४५ | श्री.अशोक बारकू वैती |
| ४६ | श्री.जनार्दन कृष्णा खेतले |
| ४७ | श्री.राम पांडूरंग रेपाळे |
| ४८ | श्रीमती सुनिता (ताई) सुरेश सावंत |
| ४९ | सौ.पाटील प्रभावती माणिक |
| ५० | डॉ.जितेंद्र प्रभाकर वाघ |
| ५१ | श्रीमती कदम निता मदन |
| ५२ | सौ.घाग संगिता चंद्रगुप्त |
| ५३ | श्री.घाग चंद्रगुप्त सिताराम |
| ५४ | श्री.कणसे घनश्याम शिवाजी |
| ५५ | श्री.मोरे संजय भाऊराव |
| ५६ | श्री.पांडूरंग गोविंद पाटील |

५७ श्री.राऊत प्रकाश हरिश्चंद्र
५८ श्री.गणेश यशवंत साळवी
५९ श्री.साप्ते राजेंद्र रमेश
६० श्रीमती काकडे अनिता बालाजी
६१ श्री.मढवी रमाकांत दशरथ
६२ श्री.राजन नारायण किणे
६३ सौ.अनिता राजन किणे

श्री.नजीब सुलेमान मुल्ला यांच्या बाजूने मतदान केलेल्या सदस्यांची नांवे खालील प्रमाणे.

१. श्री.सुधीर प्रल्हाद बर्गे

मा.महापौर पदाचे निवडणूकीत मतदान प्रक्रियेत तटस्थ राहिलेल्या सदस्यांची नांवे खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्री.राजेश रामचंद्र ठाकूर |
| २. | श्री.जगदाळे हणमंत ज्ञानू |
| ३. | सौ.कल्पना हरिश्चंद्र पाटील |
| ४. | श्री.हरिश्चंद्र श्रीपत पाटील |
| ५. | श्री.भोईर संजय देवराम |
| ६. | श्री.भोईर देवराम लक्ष्मण |
| ७. | श्री.रविंद्र माणिक पाटील |
| ८. | श्रीमती यादव केवलादेवी रामनयन |
| ९. | श्री.कांबळे सुरेश चंदू |
| १०. | श्री.राऊळ अशोक राजाराम |
| ११. | श्री.साळवी संतोष गजानन |
| १२. | श्री.मुल्ला नजीब सुलेमान |
| १३. | श्रीमती मुल्ला फातिमा अंजुम मोहम्मद असिफ |
| १४. | श्री.पाटील उमेश काशिनाथ |
| १५. | श्री.कांबळे दिनेश दाजी |
| १६. | सौ.साळवी अपर्णा मिलिंद |
| १७. | श्री.मिलिंद भारत पाटील |
| १८. | सौ.प्रमिला मुकूंद केणी |
| १९. | श्री.बिस्ट महदिप उर्फ मुन्ना |
| २०. | श्री.नारायण शंकर पवार |
| २१. | श्री.वैती हरिष काशिनाथ |

२२. श्री.होडावडेकर मधुकर विठ्ठल
२३. श्री.शैलेश तुकाराम शिंदे
२४. श्री.मनोज तुकाराम शिंदे
२५. श्री.फाटक रविंद्र सदानंद
२६. श्री.सावंत शैलेश तुकाराम
२७. सौ.संगिता मिलिंद बनकर
२८. श्री.भरत अभिमन्यू चव्हाण
२९. श्री.लक्ष्मण(लच्छू) चंदूमल टिकमाणी
३०. श्री.खारकर राजेश आत्माराम
३१. श्री.खारकर सुभाष आत्माराम
३२. श्री.सचिन जयराज म्हात्रे
३३. सौ.मनिषा महेश साळवी
३४. श्री.कुरेश यासिन अयुब
३५. श्री.सैय्यद अली अशरफ उर्फ भाईसाहब
३६. श्री.शिवदास नाना भगत
३७. श्री.भगत सुधीर रामचंद्र
३८. सौ.कोमुर्लेकर स्वाती महेंद्र
३९. श्री.महेंद्र वसंत कोमुर्लेकर
४०. श्रीमती नाईक हफिजा नसरुद्दीन
४१. श्री.अन्सारी असलम सलीम
४२. श्रीमती खान शगुफ्ता नसीर
४३. सौ.राऊत अशरिन इब्राहिम
४४. श्रीमती शेख रजिया इक्बाल
४५. श्री.डोंगरे सिराज अहमद अली
४६. श्रीमती अन्सारी इम्तियाज बानू
४७. श्री.सुभाष गणू भोईर
४८. श्री.म्हात्रे दिलीप रतन

श्री.जयनाथ यशवंत पुर्णेकर-सदस्य हे महापौर पदाचे मतदानाचे वेळी सभागृहात उपस्थित नव्हते.

श्री.अशोक बारकू वैती यांना सर्वाधिक ६३ इतकी मते मिळाली असल्यामुळे मी श्री.अशोक बारकू वैती यांना विजयी घोषित करीत आहे.

मा.विरोधी पक्ष नेता :

यामध्ये आपण बहिष्काराचा उल्लेख केलेला नाही.

मा.महापालिका सचिव :

तटस्थ म्हणून ४८ मतांचा उल्लेख केला आहे.

( सभागृहात विजयाच्या घोषणा युतीच्या उमेदवारांकडून देण्यांत येतात).

मा.पिठासीन अधिकारी :

सर्व सन्मा.सदस्यांनी आसनस्थ व्हावे आपल्या बैठकीचे इतिवृत्तांत चालू आहे. आणि जे तुम्ही म्हटले आहे की तुम्ही बहिष्कार घातला आहे त्यांची नोंद घेण्यांत आलेली आहे. दोन्ही गटांच्या मतांची नोंद घेण्यांत आलेली आहे.

मा.विरोधी पक्ष नेते :

रुलींग देत असतांना आपण म्हटले आहे की सन्मा.सदस्य श्री.अशोक वैती यांना मिळालेली मते आणि श्री.नजीब मुल्ला यांना मिळालेली मते असे म्हटले आहे. माझा मुद्दा असा की या लोकशाही आघाडीचे नेते श्री.अशोक राऊळ यांनी या सभागृहात असे सांगितले आहे की या ठिकाणी आपण हे जे प्रकरण आणले आहे ते चुकीचे आहे, निवडणूक प्रक्रिया बेकायदेशीर आहे. त्यामुळे या मतदान प्रक्रियेवर आणि मतदानावर आम्ही बहिष्कार टाकतो आहोत असे श्री.अशोक राऊळ यांनी सांगितले असतांना मा.महापौर पदाचे उमेदवार श्री.नजीब मुल्ला यांनी त्यास अनुमोदन दिलेले आहे.

मा.पिठासीन अधिकारी :

तुमच्या मुद्दयाची नोंद घेतलेली आहे, बहिष्काराची नोंद घेतली आहे.

श्री.सुभाष भोईर :

या ठिकाणी मी निवेदन करु इच्छितो की, श्री.अशोक बारकू वैती यांना ६३ मते मिळाली आहेत, ती कोणाकोणाची मते मिळाली आहेत, त्यांची नांवे जाहिर करावीत.

मा.पिठासीन अधिकारी :

मी तुमच्या बहिष्काराची नोंद घेतली आहे आणि इतिवृत्तांतामध्ये त्यांची नोंद येईल. आपण सर्व जण शांत राहिलात तर मला पुढील प्रक्रिया सुरु करता येईल.

मा.विरोधी पक्ष नेता :

पुढील प्रक्रिया सुरु करण्यास हरकत नाही परंतू आपण प्रथम हे जाहिर करा.

मा.पिठासीन अधिकारी :

निकाल जेव्हा मी जाहिर केला तेव्हा मी घोषित केले आहे की श्री.नजीब सुलेमान मुल्ला यांना एक मत पडले, आणि श्री.अशोक बारकू वैती यांना ६३ मते मिळाली आहेत आणि इतर जी मते आहेत ती तटस्थ आम्ही म्हटले आणि तुम्ही म्हणता बहिष्कृत ती ४८ मते आहेत या दोन्हीची इतिवृत्तांतामध्ये नोंद घेण्यांत आली आहे. कृपया आपण जागेवर बसून घ्या. मी प्रत्येक गोष्टीचे तुमच्या म्हणण्याप्रमाणे उत्तर देऊ शकत नाही.

मा.महापालिका सचिव प्रकरण क्रमांक १५० वाचून दाखवितात.

प्रकरण क्रमांक १५० : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१)(५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे पालिका सदस्यांपैकी एका सदस्याची (सुधारणा नियम २००६ नुसार ) ठाणे महानगरपालिकेच्या ‘ उप-महापौर ’ पदासाठी अडीच वर्षासाठी निवड करणे.

मा.महापालिका सचिव :

सदर प्रकरणी आपल्याकडे मा.उप महापौर पदासाठी एकूण तीन नामनिर्देशनपत्र दाखल झालेली आहेत. उप महापौर पदासाठी निवडणूक कार्यक्रमानुसार २९ नोव्हेंबर २००९ रोजी तीन नामनिर्देशनपत्र दाखल झालेली असून ती खालील प्रमाणे ..

१ ) श्री.सुभाष आत्माराम खारकर
२ ) श्री.लासे मनोज विठ्ठल
३ )श्री.लासे मनोज विठ्ठल

सदरील नामनिर्देशन पत्र आज दिनांक ३.१२.२००९ रोजी मी महापालिका सचिव मा.पिठासीन अधिकारी/जिल्हाधिकारी सो., यांचेकडे सुपूर्द करीत आहे.

मा.पिठासीन अधिकारी :

उपमहापौर पदासाठी आपल्याकडे तीन नामनिर्देशनपत्र दाखल झालेली असून, श्री.सुभाष आत्माराम खारकर यांचा अर्ज मी वैध घोषित करीत आहे, तसेच श्री.लासे मनोज विठ्ठल यांचा अर्ज मी वैध घोषित करीत आहे. त्यांचा आणखीन एक अर्ज आहे तो देखिल मी वैध घोषित करीत आहे.

श्री.सुभाष भोईर :

प्रकरण क्रमांक १५० परत एकदा वाचून दाखवा. तांत्रिक चूक ही एकदाच होऊ शकतो प्रकरण १५० मध्ये देखिल तीच चूक आहे. तांत्रिक चूक परत कशी आली ?

मा.पिठासीन अधिकारी :

अर्ज मागे घेण्याकरिता मी १५ मिनिटांचा वेळ देत आहे.

( कोणीही उमेदवारी मागे न घेतल्याने प्रत्यक्ष मतदानास सुरुवात होते.)

श्री.मनोज विठ्ठल लासे यांना मतदान करु इच्छिणा-यांनी सदस्यांनी हात उंचावून मतदान करावे.

( श्री.मनोज विठ्ठल लासे यांना मतदान करण्यांत येते.)

महाराष्ट्र शासन राजपत्र दि.११.२.२००५ मधील नियम ७(३) अन्वये उमेदवाराच्या बाजूने मतदान केलेल्या सदस्यांची नांवे खालीलप्रमाणे.

श्री.मनोज विठ्ठल लासे हयांच्या बाजूने मतदान केलेल्या सदस्यांची नांवे खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | सदस्यांचे नांव |
|---|---|
| १ | श्री.पाटील बाळकृष्ण पुंडलिक |
| २ | श्री.सारंग राजेश नामदेव |
| ३ | श्रीमती पाटील कविता सुरेश |
| ४ | श्री.मधुकर रामचंद्र पावशे |
| ५ | श्री.आनंदा तुकाराम केसरे |
| ६ | सौ.शिंदे मिनाक्षी राजेंद्र |
| ७ | श्री.रामचंद्र लहू फडतरे |
| ८ | श्री.दिनेश मनोहर पाथरे |
| ९ | सौ.ताई मारुती भोंडवे |
| १० | श्रीमती इंदिसे द्रौपदाबाई जगदिश |
| ११ | श्रीमती अनिता अशोक सावंत |
| १२ | श्री.नागसेन गंगाराम इंदिसे |
| १३ | श्री.सुधाकर वामन चव्हाण |
| १४ | सौ.वनिता गंगाराम इंदिसे |
| १५ | श्रीमती तरे महेश्वरी संजय |
| १६ | श्रीमती शारदा दादू पाटील |
| १७ | श्री.एगडे राम हरी |
| १८ | श्रीमती छाया मनोहर राव |
| १९ | सौ.परिषा प्रताप सरनाईक |
| २० | श्री.बारटक्के दिलीप चंद्रकांत |
| २१ | श्रीमती राधा फत्तेबहादूर सिंग |
| २२ | सौ.एकता एकनाथ भोईर |
| २३ | श्री.कांबळे पद्माकर संभाजी |
| २४ | श्रीमती अपर्णा नंदकुमार यादव |
| २५ | श्री.दशरथ बाबूराव पालांडे |
| २६ | श्री.संतोष वसंत वडवले |

२७ कु.योगिता रमेश वैती
२८ श्री.विचारे राजन बाबूराव
२९ श्री.सोनार संजय प्रभाकर
३० श्री.कोकाटे सुधीर विष्णू
३१ श्रीमती कदम रुपाली रमेश
३२ श्री.पाटणकर मिलिंद माधव
३३ श्री.लासे मनोज विठ्ठल
३४ सौ.गौरी अनिता सुनिल
३५ श्रीमती खातू सुरेखा सुरेश
३६ श्री.भोईर अशोक नारायण
३७ श्रीमती शांता शामजी सोलंकी
३८ श्रीमती इंदुलकर स्मिता सुभाष
३९ श्रीमती सुहासिनी (प्रतिभा) सुनिल लोखंडे
४० श्री.सामंत विलास शिवराम
४१ श्री.वाघुले संजय संतू
४२ श्रीमती पाटील सुजाता भास्कर
४३ श्रीमती अनिता हिराकांत फर्डे
४४ श्रीमती देशमुख स्मिता मधुकर
४५ श्री.अशोक बारकू वैती
४६ श्री.जनार्दन कृष्णा खेतले
४७ श्री.राम पांडूरंग रेपाळे
४८ श्रीमती सुनिता (ताई) सुरेश सावंत
४९ सौ.पाटील प्रभावती माणिक
५० डॉ.जितेंद्र प्रभाकर वाघ
५१ श्रीमती कदम निता मदन
५२ सौ.घाग संगिता चंद्रगुप्त
५३ श्री.घाग चंद्रगुप्त सिताराम
५४ श्री.कणसे घनश्याम शिवाजी
५५ श्री.मोरे संजय भाऊराव
५६ श्री.पांडूरंग गोविंद पाटील
५७ श्री.राऊत प्रकाश हरिश्चंद्र
५८ श्री.गणेश यशवंत साळवी
५९ श्री.साप्ते राजेंद्र रमेश
६० श्रीमती काकडे अनिता बालाजी
६१ श्री.मढवी रमाकांत दशरथ
६२ श्री.राजन नारायण किणे
६३ सौ.अनिता राजन किणे

श्री.सुभाष आत्माराम खारकर यांना मतदान करण्याकरिता सन्मा.सदस्यांनी हात उंचावून मतदान करावे.

( विरोधी पक्ष सदस्य प्रत्यक्ष मतदानावर बहिष्कार टाकल्याचे जाहिर करतात मात्र त्यांनी सभागृह सोडले नाही).

उपमहापौर पदाचे निवडणूकीचे वेळी मतदान प्रक्रीयेत तटस्थ राहिलेल्या सदस्यांची नांवे खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्री.जयनाथ यशवंत पुर्णेकर |
| २. | श्री.राजेश रामचंद्र ठाकूर |
| ३. | श्री.जगदाळे हणमंत ज्ञानू |
| ४. | सौ.कल्पना हरिश्चंद्र पाटील |
| ५. | श्री.हरिश्चंद्र श्रीपत पाटील |
| ६. | श्री.भोईर संजय देवराम |
| ७. | श्री.भोईर देवराम लक्ष्मण |
| ८. | श्री.रविंद्र माणिक पाटील |
| ९. | श्री.सुधीर प्रल्हाद बर्गे |
| १०. | श्रीमती यादव केवलादेवी रामनयन |
| ११. | श्री.कांबळे सुरेश चंदू |
| १२. | श्री.राऊळ अशोक राजाराम |
| १३. | श्री.साळवी संतोष गजानन |
| १४. | श्री.मुल्ला नजीब सुलेमान |
| १५. | श्रीमती मुल्ला फातिमा अंजुम मोहम्मद असिफ |
| १६. | श्री.पाटील उमेश काशिनाथ |
| १७. | श्री.कांबळे दिनेश दाजी |
| १८. | सौ.साळवी अपर्णा मिलिंद |
| १९. | श्री.मिलिंद भारत पाटील |
| २०. | सौ.प्रमिला मुकूंद केणी |
| २१. | श्री.बिस्ट महदिप उर्फ मुन्ना |
| २२. | श्री.नारायण शंकर पवार |
| २३. | श्री.वैती हरिष काशिनाथ |
| २४. | श्री.होडावडेकर मधुकर विठ्ठल |
| २५. | श्री.शैलेश तुकाराम शिंदे |
| २६. | श्री.मनोज तुकाराम शिंदे |

२७. श्री.फाटक रविंद्र सदानंद
२८. श्री.सावंत शैलेश तुकाराम
२९. सौ.संगिता मिलिंद बनकर
३०. श्री.भरत अभिमन्यू चव्हाण
३१. श्री.लक्ष्मण(लच्छू) चंदूमल टिकमाणी
३२. श्री.खारकर राजेश आत्माराम
३३. श्री.खारकर सुभाष आत्माराम
३४. श्री.सचिन जयराज म्हात्रे
३५. सौ.मनिषा महेश साळवी
३६. श्री.कुरेश यासिन अयुब
३७. श्री.सैय्यद अली अशरफ उर्फ भाईसाहब
३८. श्री.शिवदास नाना भगत
३९. श्री.भगत सुधीर रामचंद्र
४०. सौ.कोमुर्लेकर स्वाती महेंद्र
४१. श्री.महेंद्र वसंत कोमुर्लेकर
४२. श्रीमती नाईक हफिजा नसरुद्दीन
४३. श्री.अन्सारी असलम सलीम
४४. श्रीमती खान शगुफ्ता नसीर
४५. सौ.राऊत अशरिन इब्राहिम
४६. श्रीमती शेख रजिया इक्बाल
४७. श्री.डोंगरे सिराज अहमद अली
४८. श्रीमती अन्सारी इम्तियाज बानू
४९. श्री.सुभाष गणू भोईर
५०. श्री.म्हात्रे दिलीप रतन

मुंबई प्रांतिक महानगरपालिका महापौर/उपमहापौर निवडणूक अधिनियम ११.२.२००५ च्या अधिसूचनेद्वारे नियम ७(७) अन्वये उपमहापौर पदासाठी निवडणूक लढविणा-या प्रत्येक उमेदवारास मिळालेल्या मतांची संख्या मी खालीलप्रमाणे घोषित करीत आहे.

| | |
|---|---|
| श्री.लासे मनोज विठ्ठल | ६३ मते |
| श्री.सुभाष आत्माराम खारकर | ० मते |
| तटस्थ | ५० मते |

सर्वाधिक ६३ मते मिळालेले श्री.मनोज विठ्ठल लासे यांना सर्वाधिक मते मिळाल्यामुळे मी त्यांना विजयी घोषित करीत आहे.

श्री.नजीब मुल्ला :

पिठासीन अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयाचा आम्ही बहिष्कार करतो आहोत.

प्रकरण क्रमांक १४९ : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१)(५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे पालिका सदस्यांपैकी एका सदस्याची (सुधारणा नियम २००६ नुसार) ठाणे महानगरपालिकेच्या ' महापौर ' पदासाठी निवड करणे.

मा. सर्वसाधारण सभा निर्णय क्रमांक १६८ दिनांक ३.१२.२००९

ठराव :

मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( महापौर व उपमहापौर या पदासाठी निवडणूका घेणे) दिनांक ११ फेब्रूवारी २००५ च्या अधिसूचनेतील नियम ७(७) अन्वये, महापौर या पदासाठी निवडणूक लढविणा-या उमेदवारांपैकी श्री.अशोक बारकू वैती हयांना मतदानात सर्वात जास्त मते म्हणजेच ( ६३ मते ) पडल्याने श्री.अशोक बारकू वैती हे महापौर पदावर रितसर निवडून आल्याचे मी घोषित करीत आहे.

सही/- पिठासीन अधिकारी,
विभागीय आयुक्त यांचे प्रतिनिधी जिल्हाधिकारी, ठाणे.
विशेष सर्वसाधारण सभा,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

प्रकरण क्रमांक १५० : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१)(५)मध्ये तरतूद केल्याप्रमाणे पालिका सदस्यांपैकी एका सदस्याची (सुधारणा नियम २००६ नुसार) ठाणे महानगरपालिकेच्या ' उपमहापौर ' पदासाठी निवड करणे.

मा. सर्वसाधारण सभा निर्णय क्रमांक १६९ दिनांक ३.१२.२००९

ठ रा व :

मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( महापौर व उपमहापौर या पदासाठी निवडणूका घेणे) दिनांक ११ फेब्रूवारी २००५ च्या अधिसूचनेतील नियम ७(७) अन्वये, उपमहापौर या पदासाठी निवडणूक लढविणा-या उमेदवारांपैकी श्री.मनोज विठ्ठल लासे हयांना मतदानात सर्वात जास्त मते म्हणजेच (६३ मते ) पडल्याने श्री.मनोज विठ्ठल लासे हे उपमहापौर पदावर रितसर निवडून आल्याचे मी घोषित करीत आहे.

सही/- पिठासीन अधिकारी,
विभागीय आयुक्त यांचे प्रतिनिधी जिल्हाधिकारी, ठाणे.
विशेष सर्वसाधारण सभा,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

मा.महापालिका सचिव :

नवनिर्वाचित मा.महापौर/मा.उपमहापौर यांनी कृपया व्यासपिठावर यावे व मावळते मा.महापौर/मा.उपमहापौरांनी नवनिर्वाचित महापौर/उपमहापौरांचे स्वागत करावे.

( नवनिर्वाचित मा.महापौर/मा.उपमहापौर यांचा व्यासपिठावर सत्कार करण्यांत येतो.)
तद्नंतर राष्ट्रगित होऊन सभा समाप्त होते.

सभा संपल्याची वेळ : दु.१.३० वाजता.
महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक : ३.१२.२००९

सही/-पिठासीन अधिकारी
विभागीय आयुक्त यांचे प्रतिनिधी जिल्हाधिकारी, ठाणे.
विशेष सर्वसाधारण सभा,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.